**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. एनएसपी पोर्टल-२०२१-२२/(७७६०/२१)/शिष्यवृत्ती/ 3822 दिनांक : २०.१०.२०२१

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची NSP पोर्टलवरुन सन २०२१-२२ साठी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं-२०२१-२२/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/१११९१ दि १८.१०.२०२१

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १. केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, ३. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीनने अंमलबजावणी करण्यात येते.

**सदर शिष्यवृत्तीची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या प्राप्त सूचनांनुसार दि. १८ ऑगस्ट, २०२१ पासून सुरु झालेली आहे. तसेच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३० नोव्हेंबर, २०२१ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्ती योजनांसाठी एन.एस.पी. पोर्टलवर प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची संख्या अत्यंत कमी आहे. याबाबत सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद तीनही शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती देण्यात यावी.**

**तसेच सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांनी एन.एस.पी. पोर्टलवर इन्स्टिटयूट प्रोफाईल अचूक भरुन अद्ययावबत करणे आवश्यक आहे. प्रोफाईल अद्ययावत न केल्यास महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या अर्जावर पुढील कार्यवाही करता येत नाही. सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था मधील एकही पात्र विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव / महाविद्यालयांचे प्राचार्य यांची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.